प्रकरण ८

# नागरीकरण - अर्थ, कारणे आणि परिणाम

## (Urbanization - Meaning, Causes and Consequences)

१) नागरीकरणाचे स्वरूप
२) नागरीकरणाचा अर्थ
३) नागरीकरणाची कारणे
४) नागरीकरणाचे परिणाम
५) नागरीकरणाच्या समस्या

## १) नागरीकरणाचे स्वरूप

### (Nature of Urbanization)

शहर किंवा नगर ही संकल्पना भारतासाठी नवीन नाही. अगदी प्राचीन कालखंडापासून भारतात नागरी संस्कृतीची सुरुवात झाली आहे. सर्वात प्राचीन समजल्या जाणाऱ्या सिंधू संस्कृतीतील मोहंजोदडो व हडप्पा हे नगरांची उत्तम उदाहरणे आहेत. महाभारत व रामायण यातदेखील नगरांचा उल्लेख दिसून येतो. याबाबतीत स्पेंगेलर म्हणतात की, 'जगाचा इतिहास हा नागरी पुरुषांचा इतिहास आहे.' तात्पर्य हेच की भारतीय समाजाला नागरी संस्कृतीचे आकर्षण सुरुवातीपासूनच असलेले दिसून येते.

शहरातील विविध सुखसोयींकडे ग्रामीण जनतेने आकर्षित होणे साहजिक आहे. नागरीकरणाची प्रक्रिया ही प्राचीन कालखंडापासून चालू आहे; परंतु नागरीकरणाला जगात खऱ्या अर्थाने गती मिळाली ती औद्योगिक क्रांतीनंतरच. नागरीकरणाचे वाढते स्वरूप लक्षात घेता प्रशासकीय व समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हा प्रश्न महत्त्वाचा बनला आहे.

**नागरीकरणाचे जागतिक स्वरूप (World Nature of Urbanization):**

इ.स.१९५० मध्ये जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ३० टक्के लोकसंख्या शहरात राहणारी होती. वर्तमान स्थितीत जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकसंख्या ही शहरवासी बनली आहे. एकूण लोकसंख्या व देशातील नागरीकरणाचे प्रमाण लक्षात घेता ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड हे जगात सर्वात जास्त नागरीकरण झालेली राष्ट्रे आहेत. जगात सर्वात जास्त लोकसंख्या असलेले

शहर जपानची राजधानी 'टोकियो' तर दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे न्यूयॉर्क (अमेरिका) व लॉस एंजिलस (अमेरिका) दिसून येतात. अमेरिकेतील 'पॉप्युलेशन क्रायसिस कमिटी'ने जगातील १०० महानगरांची पाहणी केली. त्यात भारतातील पुणे हे शहर सर्वात लहान शहर आहे. यावरून जागतिक नागरीकरणाचे स्वरूप लक्षात येते.

**भारतातील नागरीकरणाचे स्वरूप (Nature of Urbanization in India):**

इ.स. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या १२१ कोटी पेक्षाही अधिक आहे. एकूण लोकसंख्येपैकी ३१.१६ टक्के नागरी लोकसंख्या आहे. देशात १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणारी जवळपास ५० शहरे आहेत. मुंबई हे देशात सर्वात जास्त लोकसंख्या असलेले शहर आहे. मुंबईनंतर अनुक्रमे कोलकाता, दिल्ली आणि चेन्नई असा क्रमांक लागतो. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात नागरी लोकसंख्येची स्थिती पुढीलप्रमाणे आहे -

| अ.क्र. | राज्य | एकूण लोकसंख्येशी नागरी लोकसंख्येचे प्रमाण |
|---|---|---|
| १) | गोवा | ४९.८% |
| २) | मिझोराम | ४९.६% |
| ३) | तामिळनाडू | ४४.०% |
| ४) | महाराष्ट्र | ४२.४% |

यावरून असे लक्षात येते की, गोवा हे राज्य भारतातील सर्वात जास्त नागरीकरण झालेले राज्य आहे, तर केंद्रशासित प्रदेशाच्या बाबतीत दिल्ली हे सर्वात जास्त नागरीकरण झालेला केंद्रशासित प्रदेश आहे. देशात सर्वात कमी नागरीकरण असलेले राज्य हिमाचल प्रदेश व बिहार हे आहे.

**महाराष्ट्रातील नागरीकरणाचे स्वरूप**

**(Nature of Urbanization in Maharashtra) :**

इ.स. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११ कोटी २३ लाख ७४ हजार ३३३ इतकी आहे. यापैकी नागरी लोकसंख्या ५ कोटी ८ लाख १८ हजार २५९ इतकी आहे. नागरी लोकसंख्येचे हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ४५.२२% इतके आहे. महाराष्ट्रात १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणारे मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक व औरंगाबाद ही चार शहरे



आहेत. महाराष्ट्रात मुंबई व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे शंभर टक्के नागरी आहेत, तर नागपूर, ठाणे, पुणे व उल्हासनगर हे चार तालुकेदेखील पूर्णपणे नागरी आहेत.

**शहर किंवा नगर म्हणजे काय?**

ज्या भागात अधिक लोकसंख्या एकवटलेली असते म्हणजेच लोकसंख्येची घनता जास्त असते, जिथे बिगरकृषी व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण ३/४ पेक्षा अधिक असते व जेथे शिक्षण, व्यापार, वाहतूक, दळणवळण, बँका, मनोरंजनाची साधने उपलब्ध असतात, तसेच विविध भौतिक सुविधा, अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्धा असतात व जेथे नागरिकांचे राहणीमान उंचावलेले असते, अशा मानवी वस्तीला नगर असे म्हणतात. लोकसंख्येनुसार व नगराच्या विकासानुसार शहराचे संक्रमणकालीन शहर, छोटे शहर, मोठे शहर व महानगर असे वर्गीकरण केले जाते.

## २) नागरीकरणाचा अर्थ (Meaning of Urbanization)

ग्रामीण भागातून शहरी भागाकडे लोकांचे होणारे स्थलांतर म्हणजे नागरीकरण होय. नागरीकरणासंबंधी विचारवंतांनी विविध बाजूंनी व्याख्या स्पष्ट केल्या आहेत.

**थॉमसन वारन** यांच्या मते, नागरीकरण म्हणजे ज्यात कृषी व्यवसायातून बिगर कृषी व्यवसायात जाण्याचा प्रयत्न करणारा समूह असतो. यामुळे जो समुदाय निर्माण होतो, तो साधारणत: मोठा असून त्याचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने व्यापार, उद्योग व शासकीय स्वरूपाचे असते.

**एन्डर्सन**च्या मते, नागरीकरण एकतर्फी प्रक्रिया नसून दुतर्फी प्रक्रिया आहे. यामध्ये केवळ ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रात स्थलांतरित होणे असे नाही तर प्रवाशांच्या दृष्टिकोनातून विश्वासात, मूल्यांत आणि व्यवहारातील स्वरूपात बदल होणे असा आहे.

**श्रीराम मोहश्वरी,** ''नागरीकरण म्हणजे ग्रामीण ते शहरी वातावरण असे लोकसंख्येचे स्थलांतरण होय.''

वरील व्याख्यांच्या आधारे नागरीकरण प्रक्रियेला साररूपाने खालीलप्रमाणे मांडता येऊ शकते.

| | ग्राम | स्थलांतर शहर |
|---|---|---|
| १) | ग्रामीण भागातील कृषी व्यवसायातील लोकांनी | इतर व्यवसायनिमित्त शहराकडे येणे. |
| २) | ग्रामीण भागातील कुशल व अकुशल बेरोजगार कारागिरांनी | रोजगारानिमित्त शहरात स्थायिक होणे. |
| ३) | ग्रामीण भागातील लोकसंख्यावाढीमुळे व अपर्याप्त उदरनिर्वाहाच्या साधनांमुळे | उपजीविकेसाठी शहराकडे स्थलांतर होणे. |
| ४) | ग्रामीण भागातील मर्यादित सुविधांमुळे | शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, व इतर सुखसोयींमुळे शहराकडे ओढा. |

## ३) नागरीकरणाची कारणे (Causes of Urbanization)

नागरीकरणाची वाटचाल पाहता व शहराबद्दलचे लोकांचे आकर्षण लक्षात घेता असे लक्षात येते की, नागरीकरण ही सतत गतिशील व न थांबणारी प्रक्रिया आहे. जगात नागरीकरणाला खरी गती औद्योगिक क्रांतीनंतर प्राप्त झाली. नागरीकरणाची गती त्या त्या शहरातील उपलब्ध असलेल्या रोजगार, व्यापार, दळणवळण, उद्योगधंदे, शैक्षणिक केंद्र, मनोरंजनाची साधने इ. सोयीसुविधांवर अवलंबून असलेली दिसून येते. जसे काही शहरांचे नागरीकरण वेगाने, तर काही अतिवेगाने व काही मध्यम गतीने, तर काही शहरांत अत्यंत मंद गतीने होताना दिसून येते. या नागरीकरणाच्या प्रक्रियेस पुढील सर्वसामान्य कारणे सांगता येतील.

***नागरीकरणाची कारणे***

*१) औद्योगिकीकरण*
*२) बिगर कृषी व्यवसायाला अधिक महत्त्व*
*३) लोकसंख्येची वाढ*
*४) वाहतूक व दळणवळणाच्या सुविधा*
*५) व्यापार व व्यवसायाचे केंद्र*



*६) विविध शैक्षणिक सुविधांचे केंद्र*
*७) शहरांचे वाढते आकर्षण*
*८) राजकीय घडामोडींचे केंद्र*
*९) पर्यटन केंद्र*
*१०) मनोरंजनाचे केंद्र*

### १) औद्योगिकीकरण (Industrialization) :

वर्तमान स्थितीत नागरीकरणाच्या प्रक्रियेला गती देणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे औद्योगिकीकरण होय. औद्योगिकीकरण व शहर या एकाच नाण्याच्या दोन बाजू बनल्या आहेत. ज्या ठिकाणी अनुकूल परिस्थिती आहे, तिथे उद्योगधंदे उभारले जातात. आजूबाजूच्या ग्रामीण भागातील जनता रोजगार व व्यापार-व्यवसायानिमित्त उद्योगधंदे असलेल्या शहराकडे स्थलांतरित होते. भारतात मुंबई, ठाणे, कोलकता, भिलाई, रुरकेला या शहरांच्या वाढीस औद्योगिकरण हे कारण महत्त्वपूर्ण ठरले आहे.

भारतात जागतिकीकरणाच्या प्रवाहामुळे कारखानदारीकडे होणारी वाटचाल झपाट्याने वाढली आहे. नवनवीन कारखानदारीमुळे ग्रामीण भागातील कुशल व अकुशल बेरोजगार तरुणवर्गाला कृषी व्यवसायातील रोजगारीच्या मूल्यापेक्षा कारखानदारीत दुपटीने मूल्य मिळत असल्याने तो वेगाने शहराकडे वाटचाल करत आहे.

### २) बिगर कृषी व्यवसायाला अधिक महत्त्व (Importance of Non-Agricultural Business) :

भारत हे जरी कृषिप्रधान राष्ट्र असले, तरी समाजाने कृषी व्यवसायाला दुय्यम स्थान दिलेले दिसून येते. याच कारणामुळे ग्रामीण भागातील जनता व्यवसाय, व्यापार व नोकरीनिमित्त शहराकडे स्थलांतरित होत आहे. गावातील स्वत:च्या मालकीची शेती असलेल्या स्वयंपूर्ण शेतकऱ्यांपेक्षा प्रशासनातील वर्ग-३ च्या कर्मचाऱ्याला अधिक प्रतिष्ठित समजले जाते. गावातील दूध उत्पादक अथवा भाजीपाला उत्पादक हा शहरातील झोपडपट्टीतून राहणाऱ्या 'पिनासुया'च्या विक्रेत्यापेक्षा कनिष्ठ समजला जातो. अशा या अनाकलनीय सामाजिक स्थितीमुळे नागरीकरणाची गती वाढत आहे.

**३) लोकसंख्येची वाढ (Growth in Population) :**

प्रचंड प्रमाणात वाढ असलेली लोकसंख्या हे शहरीकरणाचे महत्त्वाचे कारण आहे. कारण लोकसंख्येच्या विस्फोटामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ग्रामीण भागातील मोठा जनसमुदाय रोजगार, शिक्षण, आरोग्य इ. कारणांमुळे शहराकडे स्थलांतरित होत आहे. परिणामी शहरांचा आकार दिवसेंदिवस फुगत चालला आहे. त्यातल्या त्यात ग्रामीण भागात शेतीचे तुकडीकरण, नगदी पिके घेण्याची वृत्ती, शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर इ. कारणांमुळे ग्रामीण भागात बेरोजगारीचा प्रश्न अत्यंत बिकट बनला आहे. रोजगाराच्या शोधात अनेक बेरोजगार शहरांकडे स्थलांतरित होत आहेत.

**४) वाहतूक व दळणवळणाच्या सुविधा (Travelling & Communication Facilities) :**

शहराची वाढ, विकास व विस्तार तिथल्या वाहतूक व दळणवळण व्यवस्थेवर अवलंबून असते. ग्रामीण भाग व शहर यांच्यातील अंतर कमी करणारा हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. वाढलेले रस्त्यांचे जाळे, वाहतुकीची सहज व्यवस्था, संसूचनाची विविध माध्यमे इ. कारणांमुळे ग्रामीण जनतेला शहर जवळचे वाटू लागले आहे. शहरातील उपलब्ध होणाऱ्या विविध सोयींमुळे ग्रामीण भागातून आलेला माणूस शहरातच रमत आहे. दळणवळणाच्या साधनांमुळे व्यापार व व्यवसायाचे प्रमाण वाढते. परिणामी शहरीकरणाच्या प्रक्रियेला आपोआप गती मिळते.

**५) व्यापार व व्यवसायाचे केंद्र (Centre of Business & Profession):**

शहराला महत्त्व प्राप्त होण्याची जी महत्त्वाची कारणे आहेत, त्यापैकी एक शहरातील व्यापार व व्यवसायाचे केंद्र होय. ज्या शहरात दळणवळणाच्या सुविधा आहेत, अशा मध्यवर्ती शहरात विविध बाजारपेठा, विविध व्यवसाय, मोठ-मोठी दुकाने इ. सुविधा उपलब्ध असल्याने व्यापार व व्यवसायानिमित्त ग्रामीण जनता शहरांकडे आकर्षित होत आहे.

**६) विविध शैक्षणिक सुविधांचे केंद्र (Centre of different Educational Facilities) :**

विविध प्रकारच्या आधुनिक शैक्षणिक सुविधा शहरांमध्ये उपलब्ध झाल्या आहेत. आधुनिक शैक्षणिक अभ्यासक्रम, विविध शिक्षणसंस्था, शाळा, महाविद्यालये शहरात निर्माण झाले आहेत व होत आहेत. शिक्षणाच्या निमित्ताने ग्रामीण



भागातील फार मोठा जनसमुदाय शहराकडे स्थलांतरित होत आहे. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग तसेच या घटकांना विविध सुविधा व व्यवस्था पुरविणारा व्यावसायिक वर्ग शहरांकडे स्थलांतरित होत आहे.

**७) शहरांचे वाढते आकर्षण (Attraction of City) :**

शहरात सहजपणे उपलब्ध होणाऱ्या विविध सुखसोयी ग्रामीण भागातील जनसमुदायाला आकर्षित करण्यात कारणीभूत ठरत आहे. आरोग्य, मनोरंजन, शिक्षण, व्यापार, हॉटेल्स इ. घटकांमुळे शहरांचे आकर्षण वाढत आहे. परिणामी शहरांची लोकसंख्या वाढते व शहरांचा विस्तार होतो.

**८) राजकीय घडामोडींचे केंद्र (Centre of Political Activities) :**

राजकीय पक्षांचे कार्यालय, राजकीय पदाधिकाऱ्यांचे कार्यालय व निवास शहरात असल्याने पक्षाचे कार्यकर्ते व इतर सामान्य नागरिक आपले प्रश्न घेऊन तसेच भेटीगाठीनिमित्त शहराकडे येतात. तसेच प्रत्येक राज्यात राज्याच्या राजधानी व उपराजधानीच्या शहराकडेदेखील मोठा जनसमुदाय आपल्या राजकीय मागण्या व कामानिमित्त शहराकडे येतो. भारतातील अनेक शहरे केवळ राजधानीचे स्थान, राजकीय सत्तेचे केंद्र वा राजकीय पुढाऱ्यांच्या शहरातील मुक्कामामुळे विस्तारित होत आहेत.

**९) पर्यटन केंद्र (Centre of Tourism) :**

भारतातील विविध निसर्गसौंदर्य लाभलेली स्थळे, समुद्र किनारा असलेली ठिकाणे, विविध ऐतिहासिक वास्तू, थंड हवेची ठिकाणे इ. सारखी पर्यटनस्थळे शहरात रूपांतरित झाली आहेत व होत आहे. अशा पर्यटनस्थळांना भेटी देणाऱ्या देशी व परदेशी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पर्यटकांना विविध सुविधा व सोयी उपलब्ध करून देणारे विविध व्यावसायिकदेखील या पर्यटनस्थळांकडे आकर्षित होत आहे.

**१०) मनोरंजनाचे केंद्र (Centre of Entertainment) :**

शहरात उपलब्ध असणारी मनोरंजनाची साधनेदेखील शहराचा विस्तार व विकासाला कारणीभूत ठरत आहे. आपल्या अंगी असलेल्या कलागुणांना जोपासण्यासाठी व विकसित मनोरंजनाचा आनंद उपभोगण्यासाठी शहराकडे येणाऱ्या लोकांची संख्या वाढत आहे.

वरील कारणांव्यतिरिक्त ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंबपद्धतीचा ऱ्हास, ग्रामीण भागातील सामाजिक विषमता, शहरातील लष्करी स्थळे, विविध प्रशिक्षण

केंद्र, शहरातील विविध प्रशासकीय कार्यालय इत्यादी कारणांमुळे नागरीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळत आहे.

## ४) नागरीकरणाचे परिणाम (Consequence of Urbanization)

नागरीकरणाच्या परिणामाबाबत सकारात्मक व नकारात्मक परिणाम असे दोन भाग दिसून येतात. सकारात्मक परिणामात ग्रामीण जीवनात झालेला बदल, देशाचा आर्थिक विकास, सभ्यता व संस्कृतीचा विकास, शैक्षणिक प्रगती तसेच एकंदर समाजाची आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि वैचारिक दृष्टीने झालेली प्रगती शहरीकरणाच्या परिणामाबाबत सकारात्मक बाजू आहेत. नकारात्मक परिणामात शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा समावेश आहे. नागरीकरणाच्या सकारात्मक परिणाम करणाऱ्या बाबी पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**नागरीकरणाचे परिणाम**
*१) ग्रामीण जीवनमानात बदल*
*२) औद्योगिक विकास*
*३) मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती*
*४) शिक्षणाच्या विविध सुविधा उपलब्ध*
*५) राहणीमानाचा उच्च दर्जा*
*६) अंतर्गत व बाह्य व्यक्तिमत्त्वाचा विकास*
*७) सामाजिक समता व राष्ट्रीय एकात्मता*

### १) ग्रामीण जीवनमानात बदल (Change in Rural Life) :

वाहतूक व दळणवळणाच्या विविध साधनांमुळे शहर व गाव यातील अंतर कमी झाले आहे. त्यामुळे शहरी संस्कृतीचा प्रभाव ग्रामीण भागातील जनसमुदायावर झालेला दिसून येतो. ग्रामीण भागातील व्यक्तींच्या विचारात व्यापकता आली आहे. त्यांची भाषा, वेशभूषा व विचारप्रणालीत आमूलाग्र बदल झाला आहे. पूर्वी गावातील व्यक्ती शहरात आल्यावर त्याला गावातला म्हणून ओळखणे अवघड झाले आहे. नागरीकरणामुळे ग्रामीण भागातील व्यक्तींच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक विचारप्रणालीत सुधारणा झाली आहे. तसेच शहरातील विविध सोयीसुविधा गावांपर्यंत पोहोचल्या आहेत. यात दूरदर्शन, संगणक, डिश अॅन्टेना, मोबाईल इ. सारखे विविध आधुनिक तंत्रज्ञान गावापर्यंत पोहोचत आहे. थोडक्यात, ग्रामीण भागातील व्यक्तींच्या जीवनमानात एक महत्त्वपूर्ण बदल जवळच्या शहरी संस्कृतीमुळे होत आहे.



### २) औद्योगिक विकास (Industrial Development) :

औद्योगिक विकास व शहराचा विकास या दोन्ही बाबी एकमेकांशी निगडित आहे. कारण औद्योगिक विकासावरच शहराचा विकास अवलंबून आहे. त्याचप्रमाणे शहरातील मुबलक मनुष्यबळ, उद्योगासाठी लागणाऱ्या मूलभूत बाबी तसेच शहरातील वाहतूक व्यवस्था उद्योगांच्या वाढीस व विकासास पोषक असते. एकंदरच शहरीकरण उद्योगधंद्यांच्या भरभराटीच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरत आहेत.

### ३) मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती (Big Employment Creation):

वाढत्या शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होण्यास मदत झाली आहे. यामुळे अनेक प्रकारच्या व्यापाऱ्यांना चालना मिळाली आहे. गृहनिर्माण, विविध प्रकारच्या सुविधा पुरविणारे व्यवसाय, रस्ते निर्माण, रस्ते दुरुस्ती त्याचबरोबर सार्वजनिक नोकऱ्या व उद्योगधंदे, खाजगी कंपन्या अशा अनेक कारणांमुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती झाली आहे.

### ४) शिक्षणाच्या विविध सुविधा उपलब्ध (Different Educational Facilities) :

शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील समाजात शैक्षणिक जागरूकता निर्माण झाली आहे. साक्षरतेच्या प्रमाणात झपाट्याने वाढ होत आहे. शहरात विविध शिक्षणाच्या आधुनिक पद्धती व सुविधा सहजपणे उपलब्ध होत आहेत. थोडक्यात समाजात शैक्षणिक जागरूकता निर्माण करण्यात शहरीकरण पोषक ठरत आहे.

### ५) राहणीमानाचा उच्च दर्जा (High Living Standard) :

औद्योगिक विकासामुळे माणूस हा आर्थिकदृष्ट्या सुदृढ बनला आहे. त्याचबरोबर माणसाचा शैक्षणिक विकासही झाला आहे. माणसाच्या राहणीमानात आमूलाग्र बदल झाला आहे. शहरातील राहणीमानाचा ग्रामीण भागातही प्रभाव जाणवू लागला आहे. ग्रामीण भागातील लोकांना शहरातील वेशभूषेने भुरळ घातली आहे. आज खेड्यात फेटा बांधणाऱ्यांचे प्रमाण तुरळक झाले आहे. नागरीकरणाच्या परिणामामुळे ग्रामीण भागातील घरेदेखील सिमेंट कॉंक्रिटची बांधली जात आहेत. या घरांतदेखील शहरासारख्या अॅटॅच बाथरूम-किचन अशा सुविधा निर्माण केल्या जात आहेत.

### ६) अंतर्गत व बाह्य व्यक्तिमत्त्वाचा विकास (Personality Development) :

नागरीकरणामुळे ग्रामीण भागातील व शहरातील माणसांच्या अंतर्गत व

बाह्य व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यास मदत झाली आहे. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजू लागला आहे. तसेच आधुनिक विचारसरणी व दृष्टिकोनामुळे समाजाची व परिणामी माणसाची भाषा, आचार, विचार पद्धती यामध्ये आमूलाग्र बदल होत आहे.

**७) सामाजिक समता व राष्ट्रीय एकात्मता (Social Equality & National Integration) :**

नागरीकरणामुळे वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रभाव वाढला आहे. परिणामी जुन्या रूढी, परंपरा बंद होऊन अंधश्रद्धा निर्मूलन होण्यास मदत झाली आहे. परिणामी अस्पृश्यता निवारण होऊन प्रत्येक जातीला समान मानले जाऊ लागले आहे. त्यामुळे निश्चित काही प्रमाणात का होईना समाजात सामाजिक समतेची भावना निर्माण झाली आहे व राष्ट्रीय एकात्मता अधिक सुदृढ होण्यास मदत झाली आहे.

या व्यतिरिक्त आर्थिक विकास समाजाच्या सर्वांगीण विकासात नागरीकरणाची प्रक्रिया साहाय्यभूत ठरत आहे. नागरीकरणाचे जसे सकारात्मक पैलू आहेत तसेच काही नकारात्मक पैलूदेखील दिसून येतात. हे नकारात्मक पैलू अर्थात नागरीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्या नागरीकरणाचे प्रमाण जसजसे वाढत आहे, तसतसे शहरांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. यामुळे समाजावर अनेक अनिष्ट परिणाम होत आहेत. यापैकीच काही महत्त्वपूर्ण समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

## ५) नागरीकरणाच्या समस्या (Problems of Urbanization)

| *नागरीकरणाच्या समस्या* |
|---|
| *१) वाढती गुन्हेगारी* |
| *२) गलिच्छ वस्त्यांमध्ये वाढ* |
| *३) वाहतुकीची समस्या* |
| *४) प्रदूषण* |
| *५) जीवनावश्यक गरजांचा तुटवडा* |
| *६) सार्वजनिक स्वास्थ्यविषयक समस्या* |
| *७) रोजगाराची समस्या* |

**१) वाढती गुन्हेगारी (Increase in Crime) :**

सध्या शहरीकरणाचे प्रमाण एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाढले आहे की,



रोजगाराच्या आशेने शहराकडे आलेल्या बेकार तरुणांना काम मिळविणे कठीण झाले आहे. परिणामी असे बेकार तरुण गुन्हेगारीच्या मार्गाने आपली उपजीविका भागविण्याचा प्रयत्न करतात. छोट्या-मोठ्या गुन्ह्यांतूनच मोठे गुन्हेगार निर्माण होतात. लूटमार, बालगुन्हेगारी, वेश्या व्यवसाय अशा अनेक प्रकारच्या गुन्हेगारीत वाढ झाली आहे. त्यामुळे शहरातील सामान्य माणसाचे जीवन अस्थिर बनले आहे.

**२) गलिच्छ वस्त्यांमध्ये वाढ (Increase in Slums) :**

यु. एन. आय. च्या एका अहवालानुसार भारतात मोठ्या शहरातील १/४ पेक्षा जास्त लोक झोपडपट्टीत राहतात. याचे प्रमुख कारण म्हणजे शहरीकरणाला आलेले विशाल स्वरूप. रोजगाराच्या आशेने शहराकडे आलेला माणूस राहण्याकरिता मोकळ्या जागेवर अतिक्रमण करू लागला. परिणामी गलिच्छ वस्तीत वाढ झाली. अशा गलिच्छ वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा, रस्ते, वीज, वाहतूक, शिक्षण व आरोग्य या सुविधांवर नकळत परिणाम होतो.

**३) वाहतुकीची समस्या (Problems in Travelling) :**

शहरीकरणाच्या या प्रक्रियेत लोकसंख्या वाढल्यामुळे वाहतूक व रहदारीची समस्या निर्माण झाली आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अपुरी पडत आहे. परिणामी प्रवाशांना तासन्तास वाहनाची वाट पाहत थांबावे लागते, तर दुसऱ्या बाजूला खाजगी वाहनांची संख्या वाढल्यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होते.

**४) प्रदूषण (Pollution) :**

शहरातील वाढलेली कारखानदारी व वाहतुकीमुळे हवेचे प्रदूषण वाढले आहे. तसेच सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे पर्यावरणाचे असंतुलन झाले आहे. शहरात सिमेंटचे जंगल उभारले जात असल्याने स्वच्छ व निरामय वातावरण दुरापास्त होत आहे. याव्यतिरिक्त शहरात ध्वनी व जल प्रदूषणाचादेखील मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील प्रदूषणाचे प्रमाण वाढल्याने शहरातील लोकांना तोंडाला मास्क बांधून संचार करावा लागत आहे.

**५) जीवनावश्यक गरजांचा तुटवडा (Shortage of Vital Needs) :**

शहरातील लोकसंख्या वेगाने वाढत असल्याने शहरवासीयांना वीज, पाणी, स्वच्छता, आरोग्य इ. जीवनावश्यक गरजा अपुऱ्या पडत आहेत. वर्तमान स्थितीत शहरात पाणी व विजेचा तुटवडा ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण समस्या बनली आहे.